# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/12/2023 (शुक्रवार) सकाळ

## घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :- अंतर्गत तलमरे ले आउट काटोल येथे दिनांक १४/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- सौ. रमा नंदकिशोर नासरे, रा. प्लॉट नं. ९ तलमरे ले आउट काटोल याच्या घराचा मुख्य दरवाज्याचा लॉक तोडुन बेडरूम मधली आलमारीचा लॉक तोडुन आलमारीत ठेवलेले सामान त्याच्या मधुन ८ तोळे चांदीचे तोरडे व चांदीचा छल्ला, जोडवे व एक मुंगाचा मोती किंमती अंदाजे ६,०००/- रूपये आणि बेडरूम मध्ये ठेवलेले किंमती रोख रक्कम ६०००/- रू व किराणा सामान २०००/- रू असे एकुण १४०००/- रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दलाल मो. नं. ९५८८६५३९०४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :- अंतर्गत प्लॉट नं. ४९ किनखेडे ले आउट काटोल येथे दिनांक २१/१२/२०२३ ते २२/१२/२०२३ रोजी रात्री १०/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- श्रीमती पुष्पा केशवराव पाठे, वय ४८ वर्ष, रा. प्लॉट नं. ४९ किनखेडे ले आउट काटोल हिच्या घराचा मुख्य दरवाज्याचा लॉक तोडुन किचन रूमचा दरवाजा तोडुन घरात प्रवेश करून आलमारीचा लॉक तोडुन आलमारीत ठेवलेले चांदीचे तोरडे, चांदीचे जोडवे व चांदीच्या अंगठया किंमती १०००/- रू पर्स मध्ये ठेवलेले रोख रक्कम १०००/-रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दलाल मो. नं. ९५८८६५३९०४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**